सं.फौ. केस नंबर ९१/२०१९
शासन वि. तय्यबखान
निशाणी नंबर **१२**

# <u>दोषारोप</u>

मी, **श्री. एस.एस. कळसकर**, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहारा खालीलप्रमाणे तुमचेवर दोषारोप निश्चित करतो **:-**

आरोपी :- **तय्यबखान इमामखान पठाण**,
वय ३० वर्ष, धंदा - चालक,
रा. लोहारा, ता. लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद.

**येणेप्रमाणे,**

**१)** पहीले असे की, दिनांक २६/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजणेच्या दरम्यान कोमल ढाब्यासमोर आष्टामोडजवळ, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद, तुम्ही तुमच्या त्याच्या ताब्यातील क्रुझर जीप क्रमांक एम.एच. २५-आर-१३६२ ही निष्काळजीपणाने किंवा हयगयीने चालवून मोटारसायकल क्रमांक एम.एच. २५-ए.एम.-९११३ ला पाठीमागुन जोराची धडक देवुन अपघात करण्यास कारणीभूत ठरलात, व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान **कलम २७९** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**२)** दुसरे असे की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने किंवा हयगयीने चालवून नमुद मोटारसायकलला धडक देवुन महादेव काशीगावे याच्या मरणास कारणीभुत झालात, जो की सदोष मनुष्यवध होत नाही, व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधान **कलम ३०४अ** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**३)** तिसरे, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन हयगयी व निष्काळजीपणाने फिर्यादीच्या वर नमुद मोटारसायकलला धडक देवुन फिर्यादी सुधाकर पाटील व मोटारसायकलच्या पाठीमागे बसलेले महादेव काशीगावे यांना

साध्या स्वरूपाच्या जखमा करणेस कारणीभुत झालात व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम **३३७** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**४)** चौथे, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन हयगयी व निष्काळजीपणाने फिर्यादीच्या वर नमुद मोटारसायकलला धडक देवुन फिर्यादी सुधाकर पाटील व मोटारसायकलच्या पाठीमागे बसलेले महादेव काशीगावे यांना गंभीर स्वरूपाच्या जखमा करणेस कारणीभुत झालात व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाचे कलम **३३८** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**५)** पाचवे, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन हयगयी व निष्काळजीपणाने सार्वजनिक रस्त्यावर अतिवेगात चालविली व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन अधिनियमाचे कलम **१८४** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

**६)** शेवटी असे की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमुद वाहन सार्वजनिक रस्त्यावर हयगयी व निष्काळजीपणाने चालवुन अपघात केला व सदर अपघाताची बातमी नजीकच्या पोलीस ठाण्यात न कळविता व जखमींना प्रथमोपचाराची व्यवस्था न करता घटनास्थळाहुन निघुन गेलात, व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन अधिनियमाचे **कलम १३४ (अ) व (ब)** नुसार शिक्षेस पात्र अपराध केला, जो या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येणारा आहे.

'आणि मी याद्वारे असा निर्देश देतो की, उक्त दोषारोपाबद्दल तुमचेवर या न्यायालयात खटला चालवण्यात यावा.'

सही/-

दिनांक : २०-१२-२०२३.

**( एस.एस. कळसकर )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, लोहारा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

दोषारोपातील मजकुर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचून दाखविण्यात आला, तो त्याने नाकबुल करुन प्रकरण पुढे चालवण्याची विनंती केली.

सही/-

दिनांक : २०-१२-२०२३.

**( एस.एस. कळसकर )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, लोहारा.